45 (18) (19)

पंचायत राज संस्थांनी त्यांच्या
स्वउत्पन्नातुन ५% निधीतून घ्यावयाच्या
अपंग कल्याणासाठी योजना व खर्चाबाबत
मार्गदर्शक सुचना

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः जिपऊ २०१८/प्र.क्र.५४ /वित्त-३
बांधकाम भवन,मर्झबान रोड,फोर्ट, मुंबई -४०० ००१
तारीख: २५ जून, २०१८

संदर्भ:-

१) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/ प्र.क्र.४८७१/वित्त-३,दि. ५ ऑक्टोबर,२०१२
२) शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २००७/ प्र.क्र.४८७१/वित्त-३,दि. २५ जून,२०१४
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे परिपत्रक क्र. अपंग २०१५/प्र.क्र.५५/अ.क.२, दि. १८/११/२०१५
४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे क्र. अपंग २०१५/प्र.क्र.५५/अ.क.२, दि. १८/११/२०१५ चे पत्र
५) शासन निर्णय क्रमांकः अपंग २०१५/ प्र.क्र.१३७/ वित्त-३,दि.२४ नोव्हेंबर,२०१५
६) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी २०१६/प्र.क्र.२४/वित्त-३,दि.५ एप्रिल,२०१६
७) शासन निर्णय क्रमांकः व्हीआयपी२०१६/प्र.क्र.२४/वित्त-३,दि.२८ एप्रिल,२०१६
८) शासन निर्णय क्रमांकः अपंग २०१६/प्र.क्र.११०/वित्त-३,दि.२१ सप्टेंबर,२०१६
९) सामाजिक न्याय विभाग अ.शा. पत्र क्रमांक अपंग-२०१७/प्र.क्र.५/अ.क.२, दि.२८.४.२०१७
१०) केंद्र शासनाचा नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act, २०१६
११) मा. राज्यमंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखालील दि.३१/१०/२०१७ रोजीची बैठक

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम-१९६१ मधील अनुसूची-१ मध्ये नमूद केल्यानुसार जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून जिल्हा परिषदेने तर अनुसूची-२ मध्ये नमूद केल्यानुसार पंचायत समितीच्या स्वउत्पन्नातून पंचायत समितीने वेगवेगळ्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावयाचा आहे. सामाजिक न्याय विभागाने संदर्भाधिन दिनांक २८ एप्रिल, २०१७ च्या अर्धशासकीय पत्रान्वये केंद्र शासनाच्या नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act, २०१६) मधील तरतूदीनूसार कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. सदर अधिनियमातील नियम ३७ अन्वये दिव्यांगांना

विविध योजनांमध्ये ५% आरक्षण ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच त्यामध्ये दिव्यांग महिलांना प्राधान्य राहील. जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून वैयक्तिक व सामुहिक स्वरूपाच्या विविध योजना घेण्यात येतात. मात्र यासदर्भात जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून केलेल्या खर्चाचा आढावा घेतला असता वैयक्तिक लाभाच्या योजनांवर प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्याचे आढळून आले आहे. वास्तविक त्या-त्या प्रवर्गातील व्यक्तींना त्यांच्या व्यक्तीगत विकासासाठी वैयक्तिक लाभाच्या योजना हाती घेणे गरजेचे असले तरी सदरचा निधी हा प्रामुख्याने त्या प्रवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यावर खर्च होणे आवश्यक आहे. याप्रकरणी शासनस्तरावरून योजना निश्चित करून देण्यात येत आहेत. तसेच सदर निधी हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या स्वउत्पनातून खर्च करण्यात येत असल्याने कोणकोणत्या योजनांवर निधी खर्च करावा, याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिकार असणे आवश्यक आहे. सदर खर्चाबाबत काही मार्गदर्शक सुचना निर्गमित करणे शासनाच्या विचाराधीन होते. यास्तव सोबतच्या परिशिष्ट - "ब" मध्ये नमूद केलेले सर्व आदेश अधिक्रमित करून पुढीलप्रमाणे सर्वसमावेशक असे आदेश देण्यात येत आहेत.

## शासन निर्णय:-

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम २६१ पोटकलम (१) खालील अधिकारांचा वापर करून या निर्णयाव्दारे शासन असे आदेश देत आहे की, शासनाने खालीलप्रमाणे विहीत केलेल्या योजनाव्यतिरिक्त जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या स्वउत्पन्नातून दिव्यांगांसाठीच्या ५% निधीतून कोणकोणत्या योजना हाती घेण्यात याव्यात, याबाबतचे सर्व अधिकार संबंधित जिल्हा परिषद/पंचायत समिती/ग्रामपंचायत यांना देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम, २०१६ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या स्वउत्पन्नाच्या ५% निधीमधून अपंगांसाठी राबविण्यात येणाऱ्या विकासाच्या योजना खालीलप्रमाणे राहतील :-

अ) सामुहिक योजना :-

१) अपंग पुनर्वसन केंद्र,थेरपी सेंटर्स सुरू करणे ( यामध्ये भौतिक उपचार तज्ञ,व्यवसाय उपचार तज्ञ,स्पीच थेरपीस्ट,बालविकास मानसशास्त्रज्ञ व वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश असावा.)

२) सार्वजनिक इमारती व ठिकाणी अपंगांसाठी अडथळा विरहीत वातावरण निर्मिती करणे,जुन्या इमारतींचे ॲक्सेस ऑडीट करून जुन्या इमारतींमध्ये सुविधा निमार्ण करणे. यामध्ये रॅम्प्स, रेलिंग, टॉयलेट - बाथरूम,पाण्याची व्यवस्था,लिफ्टस,लोकेशन बोर्ड इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे.

३) अपंग महिला बचत गटांना सहाय्यक अनुदान देणे, यामध्ये अपंग महिलांबरोबरच मतिमंदाचे पालक असणाऱ्या महिलांचा देखील समावेश असावा.

४) अपंगांच्या स्वयंसहाय्यता गटांना अनुदान देणे.

५) अपंग उद्योजकता व कौशल्य विकास प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करणे.

६) अपंग व्यक्तींकरीता क्रीडा प्रबोधिनी स्थापन करणे व क्रीडा संचालनालयाच्या मान्यतेने क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे.

७) करमणुक केंद्रे, उद्याने (सेन्सरी गार्डन) यामध्ये अपंग व्यक्तींसाठी विशेष सुविधा उपलबध करून देणे.

८) सुलभ स्वच्छतागृहे व सुलभ स्नानगृहामध्ये अपंग व्यक्तींसाठी योग्य ते फेरबदल करणे अथवा अपंगांसाठी सोयीस्कर सुलभ शौचालय व स्नानगृहे बांधणे.

९) स्थानिक स्वराज्य संस्थाच्या रूग्णालयामध्ये तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्णबधीरांसाठी OAE ( OTO ACOUSTIC EMISSION) / बेरा ( BRAIN STEM EVOKED RESPONSE AUDIOMETRY )/PURE TONE AUDIOMETRY चिकित्सेची सुविधा निर्माण करणे.

१०) सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रूग्णालयामार्फत तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत येणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत अपंगत्व प्रतिबंधाकरीता रुबेला लसीकरण करणे व जनजागृती करणे.

११) मतिमंदांसाठी कायमस्वरूपी औषधोपचारांची गरज आहे त्यांना मोफत औषधे पुरविणे.

१२) कुष्ठरूग्णांसाठी औषधे / ड्रेसिंग तसेच सहाय्यभूत साधणे व सर्जिकल अप्लायंसेस पुरविणे.

१३) सर्व प्रवर्गाच्या अतितीव्र अपंगत्व असेलल्या व्यक्तींसाठी तात्पुरत्या अथवा कायमस्वरूपाच्या निवारा गृहाला सहाय्यक अनुदान देणे.

१४) अपंग प्रतिबंधात्मक, लवकर निदान व उपचाराच्या दृष्टीने अंगणवाडी शिक्षिका व सेविकांस प्रशिक्षण देणे.

१५) लवकर निदान त्वरीत उपचाराच्या दृष्टीने अपंगांच्या पुर्व प्राथमिक शिक्षणाची ( अर्ली डिटेक्शन सेंटर ) सुविधा पुरविणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे.

१६) अपंग व्यक्तींना समुपदेशन तसेच सल्लामसलत करणाऱ्या केंद्रांना सहाय्यक अनुदान देणे.

१७) मतिमंद मुलांच्या पालक सघांना/संघटनांना सहाय्यक अनुदान देणे.

१८) मतिमंदासाठी तात्पुरते केअर सेंटर्स/डे केअर सेंटर्स यांची स्थापना करणे.

१९) अपंगांसाठी रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करणे.

२०) अपंग मुले तसेच अपंग व्यक्तींच्या कला गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी कला ॲकेडमी सुरू करणे.

२१) अपंगत्व प्रतिबंधात्मक पुनर्वसन व सोयी सुविधांबाबत प्रचार, प्रसिध्दी व जनजागृती करणे.

२२) सार्वजनिक स्वच्छता, शाळांमध्ये मुलींसाठी शौचालये, शाळांमध्ये अपंगांसाठी विशेष शौचालये व रॅम्पस इ. अत्यावश्यक बाबींना प्राधान्य देण्यात यावे.

२३) १ ते ५ वर्षे वयोगटातील मुकबधीर मुलांवर उपचारासाठी खर्च करण्यात यावा. जेणेकरून त्यांचे अपंगत्व दूर होण्यास मदत होवू शकेल.

२४) अपंगत्व घालवण्यासाठी शिबीर आयोजित करणे, पुनर्वसन करणे, EPC केंद्रामध्ये विशेष तज्ञ घेणे या उपाययोजना कराव्यात.

२५) पॅरा - ऑलिम्पिक मध्ये भाग घेण्याकरीता दिव्यांगांना विशेष सोयी सुविधा निर्माण करून देण्यात याव्यात.

**ब) वैयक्तिक लाभाच्या योजना :-**

**१) अपंग व्यक्तींना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरीता अर्थसहाय्य देणे :-**

१.१ अंध व्यक्तींसाठी :- मोबाईल फोन.लॅपटॉप/संगणक ( जॉस सॉफ्टवेअर ).व्रेल नोट वेअर, Communication equipment Braille attachment telephone. adapted.walkers. ब्रेल लेखन साहित्य. ब्रेल टाईपरायटर. टॉकींग टाईपरायटर. लार्ज प्रिंट बुक. अल्पदृष्टी अपंगत्वावर मात करणेसाठी digital magnifiers इत्यादी सहाय्यभूत साधने व उपकरणांकरीता अर्थसहाय्य करणे.

१.२ कर्णबधीर व्यक्तींसाठी:- विविध प्रकारची वैयक्तिक श्रवणयंत्रे ( वीटीईसह ) शैक्षणिक संच.संवेदन उपकरणे.संगणकासाठीचे सहाय्यभूत उपकरणे.

१.३ अस्थिव्यंग व्यक्तींसाठी :- कॅलीपर्स. व्हीलचेअर, तीनचाकी सायकल, स्वयंचलित तीन चाकी सायकल, कुबड्या, कृत्रीम अवयव, प्रोस्थोटिक ॲण्ड डिव्हायसेस, वॉकर, सर्जिकल फुटवेअर, स्प्लीटस, मोबालिटि एड्स, कमोड चेअर्स, कमोड स्टुल, स्पायनल ॲण्ड नील वॉकी ब्रेस,डिव्हायसेस फॉर डेली लिव्हींग इत्यादी.

१.४ मतिमंद व्यक्तींसाठी :- मतिमंदांसाठी शैक्षणिक साहित्य संच ( MR kits ), बुध्दीमत्ता चाचणी संच, सहाय्यभूत उपकरणे व साधने तसेच तज्ञाने शिफारस केलेली अन्य सहाय्यभूत साधने.

१.५ बहुविकलांग व्यक्तींसाठी :- संबंधित क्षेत्रातील तज्ञाने शिफारस केलेली सुयोग्य सहाय्यभूत साधने व उपकरणे, सी.पी.चेअर, स्वयंचलित सायकल व खुर्ची, संगणक वापरण्यासाठीची सहाय्यभूत उपकरणे.

१.६ कुष्ठरोग मुक्त अपंग व्यक्ती:- कुष्ठरोगमुक्त अपंगांसाठी कृत्रिम अवयव व साधने, सर्जीकल ॲण्ड करेक्टीव्ह फूटवेअर्स,सर्जीकल अप्लायंसेस,मोबालिटि एड इत्यादी.

२) अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी अर्थसहाय्य देणे ( व्हेन्डींग स्टॉल / पिठ गिरणी / शिलाई मशीन / मिर्ची कांडप मशिन / फूड प्रोसेसिंग युनिट /झेरॉक्स मशीन इत्यादी )

३) अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी गाळे घेण्याकरीता अर्थसहाय्य देणे.

४) अपंग व्यक्तींसाठी विनाअट घरकुल देण्याची योजना.

५) तसेच ज्या घरकूल योजनांमध्ये अपंग कृति आराखड्याअंतर्गत अपंगांना विशेष सुविधा निर्माण करण्यात आलेल्या नाहीत, अशा प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण व अन्य राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत अपंगांसाठी घरामध्ये आवश्यक मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कमाल रू. २०,०००/- ( रुपये वीस हजार फक्त ) प्रति लाभार्थी इतका खर्च सदर निधीमधून करण्यात यावा.

६) कर्णबधीर अपंग व्यक्तींना कॉक्लीया इंम्लांट करण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

७) अपंग व्यक्तींना व्यवसाय प्रशिक्षणासाठी ( संगणकीय प्रशिक्षणासाठी वैयक्तिक अनुदान देणे. )

८) अपंग व्यक्तींचे राहणीमान उंचावण्याच्या दृष्टीने सोलर कंदील, सौरबंब, सौरचूल, बायोगॅस प्लांट इत्यादी घरगुती गरजांसाठी अर्थसहाय्य देणे.

९) अपंग व्यक्तींना मालमत्ता करामध्ये कुटुंब प्रमुखाची अट न लावता ५०% सवलत देणे.

१०) अपंग-अपंग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे.

११) अपंग शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दाखल्याची अट न लावता शेतीविषयक औजारे, मोटारपंप, विहीरी खोदणे, गाळ काढणे. पाईपलाईन करणे, मळणीयंत्र, ठिंबक सिंचन इत्यादीसाठी व बी-बियाणांसाठी अर्थसहाय्य देणे.

१२) अपंग शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसायासाठी ( शेळीपालन, कुक्कूटपालन, वराहपालन, मत्स्य व दुग्ध व्यवसाय ) इत्यादीसाठी अर्थसहाय्य देणे.

१३) अपंग शेतक-यांना फळबागासाठी सहाय्य अनुदान देणे.

१४) मतिमंद व्यक्तींकरीता नॅशनल ट्रस्टमार्फत राबविण्यात येणाऱ्या निरामय योजनांचे हप्ते ( प्रिमियम )

भरणेकरीता अर्थसहाय्य देणे.

१५) अपंग विद्यार्थ्यांना गणवेष तसेच विशेष शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.

१६) अपंग विद्यार्थ्यांना सर्व समावेशक शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्याकरीता त्यांच्या मदतनिसांना मदतनिस भत्ता देणे.

१७) उच्च व तांत्रिक शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती देणे.

१८) केंद्र शासनाचा लोकसेवा आयोग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेसाठी पूर्वतयारीकरीता शासकीय स्पर्धा परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम देणे.

१९) निराधार/निराश्रीत व अतितीव्र अपंग व्यक्तींना विनाअट निर्वाह भत्ता देणे.

२०) अपंग व्यक्तींना विद्युत जोड, नळकनेक्शन, झोपडी दुरूस्ती इत्यादीसाठी विनाअट अनुदान देणे.

२१) अपंग महिलांसाठीच्या सक्षमीकरणाच्या योजनांना अर्थसहाय्य देणे.

२२) सामाजिक अत्याचाराला बळी पडलेल्या पिडीत अपंग महिलांना त्यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

२३) अपंग व्यक्तींना दूर्धर आजाराच्या वैद्यकीय उपचारासाठी अर्थसहाय्य देणे. उदा. कॅन्सर, क्षयरोग, मेंदूचे विकार, ह्दय शस्त्रक्रिया इत्यादी.

२४) व्यंग सुधार शस्त्रक्रियांसाठी अर्थसहाय्य करणे.

२५) अंध विद्यार्थ्यांना वाचक व लेखनिकासाठी अर्थसहाय्य करणे.

२६) कर्णबधीरांसाठी दुभाषकांची व्यवस्था करणे.

२७) शाळा बाहय अपंगांना रात्रशाळेमध्ये शिक्षण देणे.

२८) अपंग पालकांच्या पाल्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे.

२९) अतितीव्र अपंगांच्या पालकांना अर्थसहाय्य देणे.

३०) अपंग महिलांच्या सुरक्षिततेसाठी हेल्पलाईन तयार करणे.

३१) अपंग बेरोजगाराच्या सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देणे.

३२) भिक्षेकरी अपंगांना भिक मागण्यापासून परावृत्त करण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

३३) अपंग विद्यार्थी व अपंग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे.

३४) अपंग प्रमाणपत्र वितरीत करण्याकरीता विशेष मोहिम व शिबीरांचे आयोजन करणे.

३५) ग्रामपंचायतीमार्फत बांधण्यात येणाऱ्या व्यापारी गाळ्यामध्ये दिव्यांगांना ५% आरक्षण ठेवण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**उपरोक्त नमूद केलेल्या योजनांची यादी ही विशदीकरणात्मक ( ILLUSTRATIVE ) असून ती परिपूर्ण ( EXHAUTIVE ) नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व जिल्हापरिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना त्यांच्या अधिकारात सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन त्यांच्या क्षेत्रातील परिस्थिती, निकड, मागणी लक्षात घेऊन त्यांच्या स्तरावर उपरोक्त नमूद सामूहिक व वैयक्तिक योजनांशिवाय दिव्यांगांबाबत इतरही योजना राबविण्याचे अधिकार सदर शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत.**

**२. पंचायत राज संस्थांनी निधी खर्च करतांना कटाक्षाने पालन करावयाच्या बाबी :-**

१. केंद्र शासनाच्या नि:समर्थ (अपंग) व्यक्ती अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act, २०१६) मधील तरतूदीनूसार जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींनी दिव्यांगांसाठी ५% निधी राखून ठेवावा.

२. वैयक्तिक लाभाच्या योजनांचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये खालील अटी व शर्ती विचारात घेवून थेट जमा करावा.

अ) शासन निर्णया सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील **प्रपत्र " अ "** मध्ये अर्ज ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षम प्राधिकरणाने निवड केलेल्या लाभार्थ्यांनकडून भरून घ्यावा.

आ) लाभार्थ्याकडून विहीत नमुन्यातील अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अर्जामध्ये नमूद करण्यात आलेल्या वस्तू / साहित्याची किंमत विहीत पध्दतीने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेने निश्चित करावी.

इ) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षम प्राधिकरणांची मान्यता घेण्यात यावी.

ई) सक्षम प्राधीकरणांच्या मान्यतेनंतर वस्तू / साहित्याची खरेदी न करता त्याकरीता, निश्चित करण्यात आलेल्या रक्कमेचे अनुदान जिल्हा परिषद,पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करावे.

उ) लाभार्थी वास्तव्यास असलेल्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसेवकाने लाभार्थ्यास दिलेल्या लाभाबाबतचा अहवाल ( खरेदीच्या पावतीसह ) ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच जिल्हा परिषदेस सादर करावा.

३. दिव्यांगांकरीता खर्च करण्यात येणाऱ्या निधीच्या प्रयोजनार्थ जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतील त्या योजनेच्या एकूण पात्र लाभार्थ्यांपैकी ५% लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडावेत. सदर बाब पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनाही लागू आहे.

३. **दिव्यांगांसाठी निधी खर्च करतांना कटाक्षाने पालन करावयाच्या बाबी :-**

केंद्र शासनाच्या नि: समर्थ ( अपंग ) व्यक्ती अधिनियम, २०१६ (The Rights of Persons With Disabilities Act, 2016) मधील तरतूदीनूसार खालील सूचना सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

१) **सर्व जिल्हा परिषदांनी दिव्यांगांसाठी स्वनिधीमधून ५% निधी राखीव ठेवून या निधीमधून केलेल्या प्रयोजनासाठी तरतूद वित्तीय वर्षात पूर्णपणे खर्च करावी.**

२) जिल्हा परिषदेने दिव्यांगांसाठी स्वतंत्र अपंग कल्याण निधीची स्थापना करावी.

३) **दिव्यांग कल्याणासाठी केलेली तरतूद पूर्णपणे खर्च करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन एखाद्या आर्थिक वर्षात अपंगांसाठी राखीव निधी त्या वित्तीय वर्षात खर्च झाला नाही तर त्या वित्तीय वर्षात खर्च न झालेली रक्कम जिल्हा अपंग निधीमध्ये जमा करावी.**

४) जिल्हा परिषदेप्रमाणेच पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांनी त्यांच्या स्वत:च्या उत्पन्नातून दिव्यांगासाठी ५% रक्कम राखीव ठेवावी व दिव्यांग कल्याणासाठी केलेली तरतूद पूर्णपणे खर्च करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेऊन एखाद्या आर्थिक वर्षात दिव्यांगासाठी राखीव निधी त्या वित्तीय वर्षात खर्च केला नाही तर सदर खर्च न झालेली रक्कम जिल्हा परिषदेच्या अपंग कल्याण निधीमध्ये जमा करावी.

५) पंचायत समिती व ग्रामपंचायतीकडून दिव्यांगांसाठी खर्च न केलेली रक्कम एका वर्षापर्यंत संबंधित पंचायत समिती/ ग्रामपंचायतींना त्यांच्या दिव्यांगांच्या कल्याणासाठी खर्च करावयाची असल्यास त्यासंबंधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पाठवावा व त्यास मंजूरी प्राप्त करून योजना राबविण्यात यावी.

६) एक वर्षानंतरसुध्दा पंचायत समिती/ ग्रामपंचायत यांनी रक्कम खर्च केली नाही तर ती रक्कम संपूर्ण जिल्हयाच्या दिव्यांगांच्या बाबीसाठी खर्च करण्यात येईल.

७) अपंग कल्याण निधीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

८) अपंग कल्याण निधीमधून खालील कामे घेण्यात यावीत :-

अ) अपंग कल्याण निधीमधील एकूण निधीपैकी ५०% रक्कम ही फक्त दिव्यांगांच्या वैयक्तिक लाभावरच खर्च करावी.

आ) उर्वरीत ५०%निधी पायाभूत सोयी-सुविधांसाठी खर्च करण्यात यावा.

९) स्थानिक स्वराज्य संस्थांनी अपंग व्यक्तीसाठी राखून ठेवलेल्या ५ % निधीतून कार्यान्वीत करावयाच्या सामुदायीक किंवा वैयक्तिक लाभाच्या उपरोक्त योजना जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी निर्गमित केलेल्या दि. १८ नोव्हेंबर,२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समित्यांच्या सल्ल्याने घ्याव्यात या प्रयोजनार्थ जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून ज्या वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येतील त्या योजनेच्या एकूण पात्र लाभार्थ्यांपैकी ५ % लाभार्थी अपंग प्रवर्गातील निवडावेत.

## ४. योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात जबाबदार अधिकारी:-

**१. दिव्यांगांच्या बाबतीत ५% रक्कम खर्चाची माहिती जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने मुख्य कार्यकारी अधिकारी व समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांना उपलब्ध करून द्यावी.**

**२. पंचायत राज संस्थांच्या स्वउत्पन्नातून विविध प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात आलेला निधी कल्याणकारी योजनांवर योग्य त-हेने व त्याच आर्थिक वर्षात खर्च होतो किंवा नाही हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असून रक्कम खर्ची न पडल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल.**

**३. या प्रकरणी विहीत पध्दतीचा अवलंब करून, विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर आदेशाचे काटेकोरपणे अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. जर कार्यवाही होत नाही**

असे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

५. **योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वार्षिक आखणी:-**

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांच्या स्वउत्पन्नामधून घेण्यात येणाऱ्या योजनांवरील निधी त्याच वित्तीय वर्षी खर्ची पडेल या दृष्टीने कल्याणकारी योजना आखून लाभार्थ्यांचे अर्ज स्वीकारताना मुळातच ते परिपूर्ण असावेत याची दक्षता घेण्यात यावी. त्यामुळे कार्यान्वित करण्यात येणा-या योजनांची अमंलबजावणी सत्वर होऊन रक्कम अखर्चित राहणार नाही व सदर रक्कमेचा अनुशेषही राहणार नाही. अशा योजना वर्षाच्या सुरूवातीपासूनच आखण्यात याव्यात. हा कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृती कार्यक्रम तयार करून दर महिन्यास आढावा घ्यावा. तसेच संबंधित विभागीय आयुक्तांनी सुद्धा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा. या प्रकरणी विहीत पध्दतीचा अवलंब करून, विहीत अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर आदेशाचे काटेकोरपणे अमंजवजावणी करणे बंधनकारक राहील. जर कार्यवाही होत नाही असे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६२५१२१३५७६२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aseem Gupta

Digitally signed by Aseem Gupta DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=42cb1d992ceadc1f3fea3c14e1cedf9b5ea392a9c81fdbde5629e68c9158678b, cn=Aseem Gupta Date: 2018.06.25 13:28:44 +05'30'

(असीम गुप्ता)
**शासनाचे सचिव**

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान सभा, विधान भवन, मुंबई.
५) मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधान भवन, मुंबई.

६) सर्व मा. विधानसभा व विधान परिषद सदस्य.

७) सर्व जिल्हा परिषदांचे मा. अध्यक्ष.

८) मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.

९) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग.

१०) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य. पुणे.

११) सर्व विभागीय आयुक्त (महसूल).

१२) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह).

१३) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतींसह).

१४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई (पाच जादा प्रतींसह).

१५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर (पाच जादा प्रतींसह).

१६) महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र-१, मुंबई (पाच जादा प्रतीसह)

१७) महालेखाकार (स्थानिक संस्था) महाराष्ट्र-२, नागपूर (पाच जादा प्रतीसह)

१८) संचालक तथा मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, म.रा. कोकण भवन, नवी मुंबई.

१९) सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा
(कोकण/रत्नागिरी/पुणे/नागपूर/औरंगाबाद/अमरावती)

२०) सर्व सह/उप सचिव, ग्राम विकास विभाग.

२१) जिल्हाधिकारी, सर्व.

२२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

२४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

२५) वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय/वित्त आयोग कक्ष).

२६) ग्राम विकास विभाग (सर्व कार्यासने).

२७) निवड नस्ती (वित्त-३).

प्रपत्र " अ "

शासन निर्णय क्रमांक : जिपऊ २०१८/प्र.क्र.५४ /वित्त-३, दिनांक :- २५ जून, २०१८ चे सहपत्र.

( फक्त वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लागू )

( लाभार्थ्याकडून भरुन घ्यावयाच्या अर्जाचा नमूना )

प्रति,

जिल्हा समाजकल्याण अधिकारी / *महिला व बाल विकास अधिकारी* / गट विकास अधिकारी /ग्रामसेवक,

जिल्हा परिषद ---- / पंचायत समिती ---- / ग्रामपंचायत ----

विषय :- वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठीचा निधी खाते क्रमांक ----- मध्ये थेट जमा करण्याबाबत.

१) लाभार्थ्याचे संपूर्ण नाव :-

२) लाभार्थ्याचा प्रवर्ग :-

३) अपंग लाभार्थ्याचे अपंगत्वाचे प्रमाण ( ४०%,६०%,८०% ) :-

४) लाभार्थ्याच्या बँकेचे नांव व शाखेचे नांव :-

५) लाभार्थ्याचे बँक खाते क्रमांक ( IFS Code सह ):-

६) लाभार्थ्याचा आधार कार्ड क्रमांक :-

७) लाभार्थी शासन निर्णय क्र. जिपऊ २०१८/प्र.क्र. ५४ /वित्त-३, दि.२५ जून, २०१८ मधील वैयक्तिक लाभाच्या योजनांमधून कोणती वस्तू / साहित्य घेवू इच्छितो व त्यामुळे लाभार्थ्याचा काय फायदा होणार आहे.

८) या वस्तू / साहित्याची अंदाजे किंमत :-

९) या वस्तू / साहित्याचे वैशिष्टे ( specification )

१०) यापुर्वी वैयक्तिक लाभाच्या योजनेचा लाभ मिळाला आहे का?:- होय / नाही

११) लाभ मिळाला असल्यास, लाभाचे स्वरुप व योजनेचे नाव:-

१२) प्रमाणित करतो की, जिल्हा परिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत मधील वैयक्तिक लाभाच्या योजनेतून माझ्या बँक खात्यावर वस्तू / साहित्य यासाठी वर्ग केलेल्या निधीमधून, मी वस्तू/ साहित्य दोन महिन्यांच्या आत खरेदी करेन व सदर खरेदीच्या पावत्या संबंधित ग्रामपंचायत,ग्रामसेवकांस त्वरेने सादर करेन.

(स्वाक्षरी)

(संबंधित लाभार्थी)

# परिशिष्ट " ब "

शासन निर्णय क्रमांक : जिपऊ २०१८/प्र.क्र.५४ /वित्त-३, दिनांक :- २५ जून, २०१८ चे सहपत्र.

(अधिक्रमित करण्यात येणारे शासन निर्णय)

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२००७/ प्र.क्र.४८७१/वित्त-३. दि. ५ ऑक्टोबर, २०१२

२) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२००७/ प्र.क्र.४८७१/वित्त-३, दि. २५ जून,२०१४.

३) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक अपंग २०१५/ प्र.क्र.१३७/ वित्त-३, दि.२४ नोव्हेंबर,२०१५.

४) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक व्हीआयपी २०१६/प्र.क्र.२४/वित्त-३, दि.५ एप्रिल,२०१६.

५) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.व्हीआयपी२०१६/प्र.क्र.२४/वित्त-३, दि.२८ एप्रिल,२०१६.

६) ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र. अपंग २०१६/प्र.क्र.११०/वित्त-३, दि.२१ सप्टेंबर,२०१६